दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १०५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.१५ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# राज्यात पेट्रोल-डिझेल स्वस्त मुख्यमंत्र्यांची घोषणा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात सत्तेवर आलेल्या एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील सरकारने जनतेला मोठी भेट दिली आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात पेट्रोलवरील करात ५ रुपये आणि डिझेलवरील करामध्ये ३ रुपयांनी कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता राज्यातील पेट्रोल आणि डिझेलचे दर अनुक्रमे ५ आणि ३ रुपयंनी कमी होणार आहेत.

याबाबत घोषणा करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, पेट्रोल डिझेलचे दर हे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीवर अवलंबून आहेत. केंद्राने ४ नोव्हेंबर २०२१ आणि २२ मे २०२२ रोजी केंद्राने करात कपात केली होती. त्यानंतर राज्यांनाही आवाहन केलं होतं. काही राज्यांनी कर कमी केले



होते. मात्र महाराष्ट्रात ते कर कमी झाले नव्हते. आज आम्ही पेट्रोलवरील करात ५ रुपये आणि डिझेलवरील करात ३ रुपयांनी कपात करण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र सरकारने गेल्या वर्षभरात पेट्रोल आणि डिझेलवरील करात दोन वेळा कपात केली होती. मात्र राज्यात सरकारवे पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट घटवला नव्हता. दरम्यान, राज्यात सत्तापरिवर्तन होऊन मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी शपथ घेतली होती. त्यानंतर विधानसभेत विश्वासमत जिंकल्यानंतर सभागृहाला संबोधित करताना एकनाथ शिंदे यांनी पेट्रोल आणि डिझेलवरील करात कपात करण्याचे संकेत दिले होते. त्यानुसार आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पेट्रोल डिझेलवरील कर कमी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला.

## १२ नगरपरिषदा आणि ४ नगरपंचायतीच्या निवडणुका स्थगित

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील १७ जिल्ह्यांमधील ९२ नगरपरिषदा आणि ४ नगरपंचायतीच्या निवडणुकांना स्थगिती देण्यात आली आहे. ८ जुलै रोजी निवडणूक आयोगाने या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर केल्या होत्या. मात्र, ओबीसी आरक्षणाच्या सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणुका स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. याबाबत आयोगाकडून एक परिपत्रक काढण्यात आले आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात स्थापन झालेल्या बांठिया आयोगाचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाला सादर करण्यात आला आहे. ओबीसी आरक्षणाच्या सुनावणीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेऊ नयेत, अशी भूमिका राज्यातील सर्वच नेत्यांनी घेतली होती. यामध्ये सत्ताधाऱ्यांसह विरोधकांचाही समावेश होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, नाना पटोले, पंकजा मुंडे, जयंत पाटील, धनंजय मुंडे यांच्यासह राज्यातील सर्वच नेत्यांनी ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका घेऊ नये, अशी भूमिका घेतली होती.

राज्य निवडणूक आयागाचे ८ जुलै २०२२ रोजीच्या पत्रान्वये १७ जिल्ह्यातील ९२ नगरपरिषदा व ४ नगर पंचायतींच्या सदस्यापदांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम दिला होता. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिकेची सुनावणी १२ जुलै २०२२ रोजी झाली. त्यावेळी शासनाने समर्पित आयोगाने नागरिकांच्या मागसप्रवर्गाबाबत दिलेला अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर केला. सर्वोच्च न्यायालयाने या संर्भातील पुढील सुनावणी १९ जुलै २०२२ रोजी ठेवलेली आहे. सदर पार्श्वभूमीच्या अनुषंगाने आपणास कळवण्यात येते की, आयागाचे ८ जुलै २०२२ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आलेला राज्यातील ९२ नगर परिषदा व चार नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम २०२२ याद्वारे स्थगित करण्यात येत आहे.

## मुर्तीची विटंबना करणाऱ्या आरोपीला दोन महिन्याची कैद

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

तालुक्यातील कोले गावात हनुमान मंदीरातील श्री गणेश आणि श्रीदत्त मुर्तीची तोडफोड करून विटंबना केली असले प्रकरणी मंदीर पुजाऱ्याने आज्ञात इसमा विरोधात दिनांक ११ जुलै २०२२ रोजी म्हसळा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. घटनेचा पोलिसांनी ७२/२२ भादवि कलम २९५ अन्वये गुन्हा नोंद केला होता. जनतेच्या भावना दुखविण्याचे कृत्य केले प्रकरणी

गुन्ह्याचा लागलीच तपास म्हसळा पोलिस सहा.निरीक्षक उद्धव सुर्वे यांचे मार्गर्शनाखाली पोलिस हवालदार चव्हाण, सुर्यकांत जाधव, हांबिर, फोफसे, सानप यांनी अवघ्या एकाच दिवसात संशयित इसम निखिल सुनिल खेरटकर वय वर्षे २९ रा.कोंझरी वरचीवाडी यास अटक करून त्याचेवर दोषारोपपत्र दाखल केला असता आरोपी निखिल खेरटकर याने मा.प्रथम वर्ग न्यायालयासमोर गुन्हा कबूल केला.

आरोपीस मा.न्यायालयाने दिनांक १३ जुलै २०२२ रोजी दोन महिन्याची साधी कैद ची शिक्षा सुनावली आहे. आरोपीस कडक शिक्षा होण्यासाठी सहा.सरकारी अभियोक्ता कुंदन कांबळे आणि म्हसळा पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल त्यांचे कर्तबगारीचे गौरव होत आहे.

## माजी उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांच्या कारकिर्दीची चौकशी हवी

### भाजपचे जिल्हाध्यक्ष अ.प्रशांत ठाकूर यांची केंद्र सरकारकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सन २००७ ते २०१७ या काळात हमीद अन्सारी हे देशाचे उपराष्ट्रपती होते. याच काळात त्यांच्या निमंत्रणावरून भारतात पत्रकार या नात्याने दौरे करताना भारतातील महत्वाची गोपनीय माहिती हमीद अन्सारी यांच्याकडून मिळविल्याचा गंभीर गौप्यस्फोट नुसरत मिर्झा या पाकिस्तानी गुप्तहेर महिलेने केला आहे. एकदा दोनदा नव्हे,तर तब्बल पाच वेळा अन्सारी यांनी वेगवेगळ्या निमित्ताने मिर्झा यांना भारतात निमंत्रित केले होते. या भेटीत मिळविलेली माहिती आपण आयएसआय या पाकिस्तानी गुप्तचर एजन्सीला पुरवत होतो, असे मिर्झा यांनी म्हटले आहे. भारताच्या प्रत्येक शहरात पाकिस्तानी गुप्तहेरांचे जाळे पसरले असल्याचेही मिर्झा यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे. त्यामुळे, मिर्झा आणि हमीद अन्सारी यांच्यातील संबंधांचा खुलासा होणे जरूरीचे असून त्यासाठी अन्सारी यांची चौकशी केली जावी



अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. इराणचे राजदूत म्हणूनदेखील अन्सारी यांची कारकिर्द संशयास्पद असल्याचा आरोप केला जात असून देशाच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड न करता या आरोपांची तातडीने चौकशी होणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. हमीद अन्सारी यांची उपराष्ट्रपतीपदावर नेमणूक करण्याच्या काँग्रेसच्या निर्णयाचीदेखील चौकशी झाली पाहिजे अशी मागणीही त्यांनी केली.

## श्री क्षेत्र पंचायतन मंदिर येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

### जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुरुपौर्णिमे निमित्त जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या श्री क्षेत्र पंचायतन मंदिर परिसरातील श्री साई मंदिरात सकाळी संस्थेचे अध्यक्ष प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी कुटुंबासमवेत दुग्धाअभिषेक करून गुरुपौर्णिमेची सुरुवात केली. यावेळी पनवेल मधील प्रगती महिला भजन मंडळ घाटे आळी, पनवेल आणि श्री गुरुकृपा प्रासादिक भजन मंडळ, गव्हाण-कोपर यांच्या माध्यमातून सुश्राव्य भजनसंगीत कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते. मंदिरात येणाऱ्या सर्व भाविकांसाठी पनवेलचे आदर्श नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे साहेबांच्या संकल्पने नुसार मंदिर परिसरातून आपण आरोग्य सेवा सुद्धा वेळोवेळी भाविकांना द्यावी, त्यांच्याच प्रेरणेतून आरोग्यसेवा शिबिर आयोजित केले होते या शिबिरामध्ये शेकडो भाविकांनी आरोग्य तपासणी करून घेतली.



दिवसभर मुसळधार पाऊस पडत होता परंतु त्यातही भाविकांची गर्दी होत होती, जणू काही आपण करत असलेल्या सेवा कार्याला सुद्धा मुसळधार पावसाच्या रूपाने गुरू आशीर्वाद देत होते अशा प्रकारचे भक्तीमय वातावरण सबंध परिसरात झाले होते. यावेळी त्यांच्या कुटुंबासोबतच मित्रपरिवार सुद्धा उपस्थित होता. मंदिर परिसरातील हिमांशू दिलीप पाटील इंग्लिश मीडियम स्कूल येथे गुरुपौर्णिमा कार्यक्रमासाठी प्रितम म्हात्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यावेळी कार्यक्रमात बोलताना त्यांनी सांगितले की, येथील उपस्थित शिक्षकांना पाहून मला माझ्या शाळेतील शिक्षक आठवले. गुरुपौर्णिमेच्या दिवशी शाळेतील आपल्या गुरुंना गुलाब पुष्प देऊन त्यांच्या पाया पडायची आज पुन्हा एकदा आठवण झाली, त्यावेळी शिक्षकांनी जे मला मोलाचे मार्गदर्शन केले आणि वर्गातील तासाच्या वेळी जी शिकवण दिली त्यामुळेच आज मी माझ्या स्वतःच्या शाळांमध्ये विद्यार्थी घडवण्याचे कार्य आपल्यासारख्याच नव्या पिढीच्या शिक्षकांच्या माध्यमातून करत आहे याचा मला अभिमान आहे. अशाप्रकारे त्यांनी त्यांच्या शिक्षकांच्या मार्फत कृतज्ञता व्यक्त केली. अशा प्रकारे गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून श्री क्षेत्र पंचायतन मंदिर परिसरात भक्तीसेवा आणि आरोग्य सेवेचे अनोखे संगम उपस्थित भाविकांनी अनुभवले.




## विलास फडके यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विहिघर येथील शेकापचे रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विलास नारायण फडके यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायत चिपळे, नेरे जिल्हा परिषद व सुकापुर विभाग, करूनेश्वर वृद्धाश्रम भानघर, स्नेहकुंज आधारगृह वृद्धाश्रम नेरे तसेच सील आश्रम वांगणी येथे १५ जुलै रोजी सकाळी दहा वाजल्यापासून अन्नदान वाटप करण्यात येणार आहे.

तसेच चिपळे ग्रामपंचायत हद्दीमध्ये वृक्षारोपण करण्यात येणार आहे. यावेळी आधार कार्ड ला मोबाईल लिंक करणे व लहान मुलांचे आधार कार्ड मोफत काढून देण्यात येणार आहे. हनुमान मंदिर, विहिघर येथे कार्यक्रम होणार आहे. तर १६ जुलै रोजी ई श्रम नोंदणी, निराधार आणि विधवा महिला पेन्शन योजना, मुलांसाठी बालसंगोपन, महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिनचे वाटप केले जाणार आहे.



## द्रौपदी मुर्मू यांना महाराष्ट्रातून विक्रमी मते मिळतील

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) उमेदवार द्रौपदी मुर्मू यांना महाराष्ट्रातून एनडीएच्या मतांपेक्षाही अधिक मते मिळतील व विक्रमी मताधिक्य मिळेल, असा विश्वास गुरुवारी मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.




राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी मतदार असलेल्या खासदार व आमदारांशी संवाद साधण्यासाठी द्रौपदी मुर्मू आल्या होत्या. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात एनडीएच्या नेत्यांनी वरील विश्वास व्यक्त केला. यावेळी व्यासपीठावर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, केंद्रीय मंत्री नारायण राणे, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, डॉ. भारती पवार, भाजप राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, सी. टी. रवी, मुंबई भाजप अध्यक्ष मंगलप्रभात लोढा, आशिष शेलार व भारत गोगावले उपस्थित होते. शिवसेनेसह एनडीएचे घटकपक्ष, सहयोगी पक्ष व अपक्ष आमदार बैठकीस उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या पवित्र भूमीला माझा नमस्कार, अशी मराठीतून सुरुवात करून द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, देशाला गौरन्वित करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महान व्यक्ती या राज्यातून झाल्या. उद्योग, व्यापार, शिक्षण, कृषी अशा सर्व क्षेत्रात महाराष्ट्राने प्रगती केली आहे. राज्यातील आमदार खासदारांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल आपण आभारी आहोत.

## जेएनपीए सागरी मार्गावरील प्रवासी लाँच सेवा ठप्प

**दै.रायगड नगरी । उरण**

विविध बंदरात धोक्याचा इशारा देणारा तीन नंबरचा बावटा लावण्यात आला आहे. त्यामुळे गेटवे -एलिफंटा, गेटवे -जेएनपीए, मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस या मार्गावरील सागरी वाहतूक काल संध्याकाळपासूनच बंद करण्यात आली आहे. धोक्याच्या इशाऱ्यानंतर या सागरी मार्गावरील प्रवासी, पर्यटक वाहतूक कोलमडली असल्याची माहिती बंदर अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

खराब हवामान आणि पावसाचा …/२



भाड्याने देणे आहे

जिल्हा सत्र न्यायालय समोरील, लोखंडीपाडा, पनवेल येथील हॉटेल भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९८६७७०४४१६/ ९५९४०९३१११

# अतिवृष्टीमुळे जमलेले पावसाचे पाणी ओसरल्यानंतर

राज्यात काही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी होऊन पूर परिस्थिती निर्माण झाल्याचे चित्र निदर्शनास येते आहे. मान्सून पूर्वतयारीच्या अनुषंगाने पूर परिस्थितीमध्ये करावयाच्या कार्यवाहीबाबत शासनाकडून प्रशासन तसेच नागरिकांसाठी वेळोवेळी विविध सूचना दिल्या जातात. राज्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली सध्याची परिस्थिती लक्षात घेवून नागरिकांच्या आरोग्यासंदर्भात काळजी घेण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागाने राज्यातील आरोग्य यंत्रणेसाठी महत्वाच्या सूचना जारी केल्या आहेत.

काय आहेत या सूचना.. जाणून घेवू या.. या लेखाच्या माध्यमातून..

१) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी समन्वय: प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कक्ष पूर परिस्थितीचे दैनंदिन सनियंत्रण करीत आहे. जिल्हास्तरीय आरोग्य विभागाने या कक्षाशी नियमित समन्वय राखणे आवश्यक आहे. यामुळे पूर परिस्थिती नेमकी कोठे आहे, कोणती गावे पूरग्रस्त झाली आहेत, याबाबतची अचूक माहिती वेळेवर मिळेल. २) आरोग्य पथकः पूरबाधित गावात वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांचे पथक औषधासह पाठवावे. मोठ्या लोकसंख्येच्या गावात कमीत कमी दोन महिला कर्मचारी व दोन पुरुष कर्मचारी यांचा समावेश असावा. तसेच कमी लोकसंख्या असलेल्या गावात एक महिला व एक पुरुष कर्मचारी असावा. हे पथक पूरग्रस्त गावात चोवीस तास राहील याची दक्षता घ्यावी. ३) पुरेसा औषध साठा: पूरग्रस्त गावात साथीचे आजार उद्भवू नये यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व जीवनावश्यक औषधांचा साठा जिल्हा रुग्णालयापासून पूरग्रस्त गावापर्यंत उपलब्ध करावा व पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेली ब्लिचिंग पावडर, क्लोरीन टॅबलेट, लिक्वीड क्लोरीन याचा पुरेसा साठा गावपातळीवर उपलब्ध करावा. ४) दैनंदिन रुग्ण सर्वेक्षण: पूरग्रस्त गावात आरोग्य कर्मचाऱ्याने आशा कार्यकर्तीचा सहभाग घेऊन प्रत्यक्ष घरोघर भेट देऊन जुलाब, उलटी, ताप व इतर आजारांच्या रुग्णांचे सर्वेक्षण करावे. सर्वेक्षणात आढळून आलेल्या रुग्णांवर प्रतिबंधात्मक नियंत्रणात्मक उपचार करावेत. सर्वेक्षणामध्ये गंभीर रुग्ण आढळून आल्यास वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने पुढील उपचारासाठी संदर्भित करावे. ५) किटकजन्य आजार नियंत्रणासाठी करावयाची कार्यवाही: पूरग्रस्त गावांमध्ये दैनंदिन गृहभेटी देऊन ताप रुग्ण सर्वेक्षण करण्यात यावे. हिवताप रुग्णाचे निदान ४८ तासांमध्ये होईल याची दक्षता घ्यावी. आवश्यक ठिकाणी हिवताप निदानासाठी रॅपिड डायग्नोस्टिक किटचा वापर करावा. हिवताप दूषित रुग्णांना वेळेवर समूळ उपचार देण्यात यावा. ज्या भागात तापाचे रुग्ण आढळून येत आहेत तथापि ते हिवताप बाधित दिसत नाहीत, अशा ठिकाणचे रक्त नमुने डेंग्यू आणि चिकनगुनिया तपासण्यासाठी सेंटिनल सेंटरला पाठवावेत. घरभेटीच्या वेळी आरोग्य कर्मचाऱ्यांनी किमान २० टक्के घरांच्या मध्ये पाण्याच्या साठ्याची तपासणी करून डासअळीचे प्रमाण निश्चित करावे आणि अळीनाशक कार्यवाही करावी. पूरग्रस्त गावातील पाण्याची साचलेली डबकी वाहती करावीत. योग्य डासोत्पत्ती स्थानामध्ये डास अळी भक्षक गप्पी मासे सोडावेत. ज्या गावात डास अळी घनता दोन पेक्षा अधिक आहे आणि ज्या ठिकाणी संशयित चिकनगुनिया अथवा डेंग्यू तापाचे रुग्ण दिसून आले आहेत, अशा वापरावयाच्या पाण्याच्या साठ्यामध्ये टेमिफॉस हे अळीनाशक टाकावे. गावात दर पंधरवड्याला कीटकनाशक धूर फवारणीच्या दोन फेऱ्या आठवड्याच्या अंतराने घ्याव्यात. पूरग्रस्त भागातील पाणी साचून राहणाऱ्या डासोत्पत्ती स्थानांवर अळीनाशकांची फवारणी करावी. दलदलीची ठिकाणे, कचऱ्याचे ढीग, मृत जनावरे कुजलेले धान्य आणि इतर दुर्गंधीच्या ठिकाणी ५% मॅलेथिऑन पावडरची आवश्यकतेनुसार धुरळणी करावी. या किटकनाशकांच्या खरेदीसाठीचा खर्च ग्राम आरोग्य स्वच्छता आणि पोषण समितीच्या अनुदानामधून करण्यात यावा.

६) विस्थापित रुग्ण प्रणाली: मुख्यत्वे शहरी व ग्रामीण भागात घरामध्ये पाणी शिरल्यामुळे विस्थापित झालेल्या लोकांसाठी उदा. शाळा, मंगल कार्यालये, देवालय इ. ठिकाणी वैदयकीय पारं दररोज आरोग्य तपासणी करून औषधोपचार करावा. ७) मनुष्यबळ प्रणाली: पूरबाधित गावांमध्ये आरोग्य कर्मचारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यास अथवा अपुरे असल्यास आपल्या कार्यक्षेत्रातील इतर आरोग्य संस्थांमधून प्रतिनियुक्ती देण्यात यावी. ८) आरोग्य शिक्षण: दवंडी, भित्तीपत्रके, ध्वनीक्षेपण यंत्रणेद्वारे (मायकिंग) पूरपरिस्थतीमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत जनजागृती करावी. ९) सार्वजनिक आरोग्य प्रणाली: आरोग्य कर्मचाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रात असलेल्या हॉटेल, भोजनालय, रसवंतीगृहे व इतर अन्न व पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व संस्थांचे स्वच्छता व पाण्याचा वापर याची नियमित तपासणी करावी. १०) पाणी गुणवत्ता नियंत्रणः पूर परिस्थिती उद्भवल्यामुळे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दूषित होतात यास्तव ग्रामपंचायतीकडे कार्यरत असलेल्या जलसुरक्षकामार्फत पिण्याच्या पाण्याचे युध्दपातळीवर शुध्दीकरण करण्यात यावे. पाणी नमुने नियमितपणे जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवावेत. ग्रामपंचायतीकडे जलसुरक्षकाचे पद रिक्त अथवा कार्यरत नसल्यास संबंधित गटविकास अधिकारी यांच्याशी समन्वय ठेवून पर्यायी व्यवस्था करावी. आरोग्य सेवक, आरोग्य सहाय्यक यांनी पाणी शुध्दीकरणाचे दैनंदिन पर्यवेक्षण करावे. पाणी शुध्दीकरण करण्यासाठी खालील सूत्राचा वापर करण्यात यावा-गोल विहिरीचे पाण्याचे मोजमाप करण्याचे सूत्र: (व्यास) २ ु पाण्याची खोली ु ७८५ = एकूण लिटर पाणी (सर्व मापे मीटरमध्ये) चौकोनी विहिरीचे पाण्याचे मोजमाप करण्याचे सूत्र: लांबी ु रुंदी ु पाण्याची खोली ु १००० = एकूण लिटर पाणी (सर्व मापे मीटरमध्ये) प्रत्येक १००० लिटर पाणी क्षमतेच्या पाणीसाठ्यासाठी ग्रॅम ब्लिचिंग पावडरचा (३३% उपलब्ध क्लोरीन असलेली) वापर करावा. पाणी शुध्दीकरणानंतर क्लोरीनची मात्रा ०.५ पीपीएम राहावी, याची दक्षता घ्यावी. घरोघरी शुध्दीकरण करण्यासाठी मदर सोल्यूशन किंवा मेडीकल द्रावणाचा वापर करावा. मदर सोल्यूशन एक लिटर पाण्यामध्ये एक ग्रॅम पावडर टाकून तयार करावे व प्रत्येक २० लिटरसाठी ४ ते ५ थेंब मदर सोल्यूशन टाकावे आणि अर्ध्या तासानंतर पाणी पिण्यास वापरावे. पाणी शुध्दीकरणाची ओ. टी. टेस्टने खातरजमा करावी.

११) ब्लिचिंग पावडर उपलब्धता व गुणवत्ता नियंत्रणः ग्रामपंचायतीने गुणवत्ता असलेलीच (उपलब्ध क्लोरीन २०१७ पेक्षा जास्त) ब्लिचिंग पावडर वापरावी. तसेच आवश्यक असलेला ब्लिचिंग पावडर साठा ग्रामपंचायत मुख्यालयी उपलब्ध ठेवावा व पावडरची गुणवत्ता जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेमार्फत तपासून त्यांच्या अभिप्रायानार सुयोग्य पावडरचा पाणी गुणवत्ता नियंत्रणासाठी वापर करावा. आरोग्य कर्मचाऱ्यांनी त्याचे पर्यवेक्षण करावे. १२) पाणीपुरवठा वितरण प्रणाली मधील गळत्याः पाणीपुरवठा वितरण प्रणालीमध्ये असलेल्या नळ गळत्या व व्हॉल्व गळत्या युध्दपातळीवर दुरुस्त कराव्यात. कारण पूर परिस्थितीत पाणीपुरवठा वितरण प्रणालीमध्ये दूषित पाणी जाऊन पिण्याचे पाणी दूषित होण्याचा व साथ उद्रेक होण्याचा मोठा धोका असतो. १३) टँकरने पाणी पुरवठाः पूर परिस्थतीत पिण्याच्या पाण्याचे निर्जंतूकीकरण करणे काही गावात शक्य नसल्यास वरिष्ठ कार्यालयाच्या सहकार्याने टँकरच्या सहाय्याने निर्जंतूकीकरण केलेल्या पाण्याचा पुरवठा करावा. १४) लेप्टोस्पायरोसिस प्रतिबंधात्मक औषध उपचार योजनाः पूराच्या पाण्यातून चालल्यामुळे अनेकांना लेप्टो आजाराचा धोका संभवतो. याकरिता अतिजोखमीच्या भागात प्रतिबंधात्मक स्वरुपात डॉक्सीसायक्लीन हे औषध मार्गदर्शक सूचनांनुसार देण्यात यावे. १५) आरोग्य विभाग इमारती व संसाधने याबाबत माहिती: पूर परिस्थितीमुळे सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत उपकेंद्र स्तरापासून ते जिल्हा रुग्णालयापर्यंत कार्यरत असणाऱ्या आरोग्य संस्थांच्या इमारती अथवा इतर संसाधने यांच्यावर काही परिणाम झाला आहे का, याचा दैनंदिन आढावा घ्यावा. अनेकदा पूराने वेढल्यामुळे आरोग्य विभागात कार्यरत मनुष्यबळ विशिष्ट ठिकाणी अडकून पडते. त्याबाबत माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करावी. पूर परिस्थितीमुळे विद्युत पुरवठा खंडित झाल्याने लस साठा वाया जाण्याची शक्यता लक्षात घेऊन हा साठा ज्या ठिकाणी विद्युत पुरवठा सुरु आहे, त्या ठिकाणी हलवावा किंवा तो जिल्हास्तरावरील शीतसाखळी मध्ये ठेवावा. १६) गरोदर मातांची विशेष काळजी: पूरग्रस्त भागांमध्ये असलेल्या गरोदर मातांची यादी करून त्यातील किती जणींच्या प्रसूतींची संभाव्य तारीख या काळात आहे, हे लक्षात घेऊन अशा मातांच्या प्रसूतीसाठी त्यांना सोयीच्या आरोग्य संस्थामध्ये हलवावे. यासंदर्भात अतिजोखमीच्या गरोदर मातांची विशेष काळजी घेण्यात यावी. पूर परिस्थिती, त्यामुळे बसलेला मानसिक धक्का या कारणांमुळे अनेक मातांची प्रसूती वेळेपूर्वी होऊ शकते, काही जणींचा गर्भपात होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. या सर्व मातांचे दैनंदिन सर्वेक्षण करून त्यांना आवश्यक सेवा पुरविण्यात याव्यात आणि गरजेनुसार त्यांना योग्य ठिकाणी संदर्भित करण्यात यावे.१७) सर्पदंश-विचूदंश उपचारांची आवश्यक सुविधाः पावसाळ्यात तसेच पुरामुळे उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये अनेकदा पूरग्रस्त भागामध्य सर्पदंश आणि विचू दंशाचे प्रमाण वाढते. यासाठी लागणारी आवश्यक औषधे सर्व आरोग्य संस्थांमध्ये पुरेशा प्रमाणात उपलब्ध असावीत. १८) परिसर स्वच्छता: अतिवृष्टीबाधित गावाचा परिसर अस्वच्छ झालेला असल्यामुळे किटकांचा प्रादूर्भाव वाढीस लागतो व किटकजन्य व जलजन्य आजार तीव्र गतीने पसरण्याची शक्यता असते. यास्तव या गावाची परिसर स्वच्छता करून घेणे गरजेचे आहे. १९) आंतर विभागीय समन्वयः साथरोग नियंत्रणासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ग्रामविकास विभाग, नगरविकास विभाग, कृषी खाते व पशुसंवर्धन या सर्व शासकीय विभागांशी समन्वय ठेवावा. २०) पूर परिस्थितीचा दैनंदिन अहवाल: प्रत्येक जिल्ह्याने आपल्या कार्यक्षेत्रातील पूर परिस्थितीचा दैनंदिन अहवाल सतत अद्ययावत ठेवावा. अशा प्रकारे महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा संचालनालय, पुणे या कार्यालयाकडून संचालक डॉ.नितीन अंबाडेकर यांनी सर्व जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सविस्तर सूचनांचे परिपत्रक जारी केले आहे.

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे आणि रायगड जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे नागरिकांच्या आरोग्याची सर्वोतोपरी काळजी घेण्यासाठी पूर्ण तयारीनिशी सज्ज आहेत. तरी नागरिकांनी या आपत्तीकाळात आरोग्याच्या कोणत्याही समस्या उद्भवल्यास नजीकच्या उपजिल्हा रुग्णालय किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**

# साथरोगाला आळा बसण्याच्या दृष्टीने नागरिकांनी पाण्याची जैविक तपासणी करून घ्यावी : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जून ते सप्टेंबर या कालावधीत पाण्याची जैविक तपासणी करणे गरजेचे आहे. पाण्याची जैविक तपासणी साथरोगाला आळा बसण्याच्या (जसे काविळ, अतिसार, कॉलरा इ.) दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. तरी नागरिकांनी प्रयोगशाळेतून पाण्याची गुणवत्ता तपासून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा कार्यालयाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक श्री.हनुमंत संगनोर यांनी केले आहे.

रायगड जिल्ह्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा या कार्यालयाच्या अंतर्गत ०६ पाणी तपासणी प्रयोगशाळा (०१ जिल्हा व ०५ उपविभागीय प्रयोगशाळा) कार्यरत आहेत. जिल्हा प्रयोगशाळा ही अलिबाग तालुक्यात व पेण, महाड, माणगाव, कर्जत, रोहा तालुक्यात अशा एकूण ०५ उपविभागीय प्रयोगशाळा कार्यरत आहेत. तसेच आरोग्य विभागांतर्गत ०१ जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा ही अलिबाग तालुक्यात कार्यरत आहे.

या प्रयोगशाळांमार्फत सार्वजनिक तसेच खाजगी पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची जैविक व रासायनिक तपासणी करुन पाण्याची गुणवत्ता तपासली जाते. या प्रयोगशाळांचे सनियंत्रण उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता विभाग, रायगड जिल्हा परिषद यांच्यामार्फत केले जाते.

तरी नागरिकांनी प्रयोगशाळेतून पाण्याची गुणवत्ता तपासून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा कार्यालयाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक श्री.हनुमंत संगनोर यांनी केले आहे.

# आयुष्यातील जगण्याचा आनंद गुरू देत असतात : प्रा.एल.बी. पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**



महात्मा गांधी विद्यालय दिघोडे येथे गुरुपौर्णिमे निमित्त कोकण मराठी साहित्य परिषद उरणचे कविसंमेलन संपन्न झाले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य रायगडभूषण प्रा.एल.बी. पाटील हे मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपण आपलं आयुष्य असताना त्या जगण्याचा खरा आनंद आपले गुरू देत असतात. त्यावेळी घेण्यात आलेल्या कविसंमेलनात प्रा.एल.बी. पाटील यांनी आगरी बोलीतील विनोदी कवितांनी वेगळी रंगत आणली तर लोकशाहीर मोरेश्वर म्हात्रे यांच्या शाहिरी ढंगाच्या कवितांनी विद्यार्थ्यांत जोश भरला. रंजना केणी, एम. एस. थळी यांच्या निसर्ग कविता, भगवान पोसू , व्ही. डी.बडगुजर, स्नेहा कोळी, यांच्या सामाजिक कवितांनी कवी संमेलन रंगतदार केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक नाथा नाईक यांनी अध्यक्षीय भाषणात गुरूचे महत्त्व सांगितले तर जितेंद्र पिंगळे सरांनी कवितेतून कवीचा जन्म ही कल्पना छान मांडली. यावेळी एस.टी.फळे, डी.के.चव्हाण, पी.पी घरत, एम.जी .शिवभगत एल.एल.हंबिर, प्रतीक्षा मंदार यांची उपस्थिती उल्लेखनीय होती. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन रंजना केणी यांनी केले.

# खड्डयात वृक्षारोपण करीत आम आदमी पार्टीचे अनोखे आंदोलन

**दै.रायगड नगरी । खोपोली**

जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गच्या रस्त्यावरील वाढत्या खड्डयांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांकडून बुधवार दि.१३ जुलै रोजी दुपारी २.०० वाजता रस्त्यावरील खड्डयात वृक्षारोपण करीत अनोख्या पद्धतीने आंदोलन करीत अधिकारी, पदाधिकार्यांचे कामावर लक्ष वेधण्या साठी तसेच रस्तेच्या दर्जाची पाहणी करण्या साठी आंदोलन करण्यात आले.



राष्ट्रीय महामार्गच्या चौपदरी करण्याचे काम २०१७ मध्ये सुरु झाले होते हे काम इगल इन्फ्रा हा ठेकेदार करत होता.सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार रस्त्याची देखभाळ दुरुस्ती २०२३ पर्येंत इगल इन्फ्रा ह्या ठेकेदारा कडे आहे.पावसाळा सुरवात होण्या आधी ह्या रस्त्याचे डांबरी करणाचे काम करण्यात आले होते.कामाला कामाचा दर्जा नसल्याने पावसाळा सुरवात होताच रस्त्यावरील डांबर निगुन खड्डे पडण्यात सुरवात झाली.खालापूर फाट्या पासून ते फॉरेस्ट चेकनाका पर्येंत खड्ड्याचे साम्राज्य पसरले असल्याचे दिसून येत आहे. खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा हेच समजून येत नाहीं.ह्या महामार्गांवर प्रवास करने जिगरीचे झाले आहे.खड्ड्यान मुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे.या रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे नागरिकांना पाठ दुखणे, मणक्याचा त्रास आदी समस्यांना सामोरे जावे लागत आहे.आता खड्ड्यात अदळून अनेकांचे जीव गेल्यावर एम.एस आर. डी.सी.चे अधिकारी लक्ष् देणार का? काम सुरु असतानाच वापडण्यात येणाऱ्या डांबरच्या दर्जेची पडताळणी हे अधिकारी का करीत नाहीं?इंजिनिअर उभे असताना कामाला कामाचा दर्जा का मिळत नाहीं?टोल टॅक्स घेऊन ही चांगला दर्जे दार रस्ता नागरिकांना का मिळत नाहीं? असा संताप सवाल प्रवासी वाहन चालकांसह नागरिकांमधून होत आहे. यावेळी आम आदमी पार्टीकडून अनोखे आंदोलन करून खड्डयांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले.या रस्त्यावर पडलेले खड्डे लवकरात लवकर भरावे व रस्तेच्या दर्जेची चौकशी करून संबंधित ठेकेदारावर योग्यशीर कारवाई अशी मांगणी आम आदमी पार्टी कडून होत आहे.

# गणेशभक्तांसाठी रोहा आणि चिपळूण दरम्यान ३२ मेमू धावणार

**दै.रायगड नगरी । धाटाव**

कोकणातील सर्वात मोठ्या उत्सवाची तयारी सर्व स्तरावरुन सुरू आहे. येत्या गणेश उत्सवासाठी मध्य रेल्वे पुढे सरसावली आहे. रोहा ते चिपळूण यादरम्यान ३२ मेमू रेल्वे गाड्या धावणार आहेत अशी माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण पाटील यांनी दिली.

याबाबत प्रसिद्धी पत्रक १२ जुलै २०२२ रोजी जनसंपर्क विभाग मध्य रेल्वे यांचे वतीने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून प्रसारीत करण्यात आले आहे. या निर्णयामुळे गणेश भक्तांच्या कोकणातील प्रवास मध्य रेल्वेमुळे सुखकर होणार आहे.


चाकरमानी यांना आपल्या गावी असलेल्या गणेशोत्सवाची ओढ असते. त्यासाठी गणेश भक्त दोन महीने आधीपासून तयारीला लागतो. २०२२ च्या गणपती उत्सवादरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वे रोहा ते चिपळूण दरम्यान ३२ मेमू गाड्या चालवणार आहे. या ३२ जादा गाड्यांमुळे २०२२ मध्ये एकूण गणपती विशेष गाड्यांची संख्या १९८ होईल.

# वारंवार होणारे अपघात पाहून रमेश पुलेकरने श्रमदानातून खड्डे भरले

**दै.रायगड नगरी । मुरुड**

सामान्य नागरिक रमेश पुलेकर ने मुरुड समुद्रकिनारी पार्वती लॉज जवळ पडलेले भले मोठे श्रमदानातून भरले आहेत. या ठिकाणी अनेक दुचाकी वाहन खड्ड्यांमुळे पडून अपघात होत होते. हे डोळ्यांदेखत होणारे सतत अपघात पाहून रमेश पुलेकर ने स्वतः खड्डे भरण्याचा निर्णय घेतला. व जवळच असलेल्या रॅबीटचा वापर करून हे मोठे खड्डे भरले. त्यामुळे वाहन चालकांना दिलास मिळाला आहे.

मुरूड समुद्रकिनाऱ्यावरील रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येत आहे. या खड्डयांकडे सा.बा.वि आतातरी लक्ष देतील का ? असा सवाल जनमानसातून केला जात आहे. रमेश पुलेकर ने केलेल्या या श्रमदानामुळे तुर्तास तरी वाहन चालकांना दिलास मिळाला आहे. त्यामुळे रमेशवर सर्व स्तरावरुन कौतुकांचा वर्षाव होत आहे.




Kamalgauri Hiru patil shikshan sanstha

**B.K.PATIL INSTITUTE OF PHARMACY**

(Affiliated to University of Mumbai and MSBTE, Approved by AICTE, DTE, PCI and Govt.of Maharashtra)

Address:-Plot no.29, Sec-11, Taloja Navi Mumbai

**Walk In Interview**

Applications are in invited for the following posts.

| Sr.no. | post | Qualification | Designation |
| --- | --- | --- | --- |
| 1 | 2 | M.Pharm(Pharmacology) | Assistant professor |
| | 2 | M.Pharm(Medicinal Chemistry) | Assistant Professor |
| 2 | 4 | B.Pharm or M.Pharm | Lecturer |
| 3 | 3 | D.Pharm | Lab.Technician |

Note:-Qualification and experience required as per AICTE and PCI Norms Candidate may mail their resumes on kghpss.2019@gmail.com

**Principal**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## जेएनपीए सागरी मार्गावरील प्रवासी लाँच सेवा ठप्प

फटका येथील सागरी प्रवासी वाहतुकीलाही मोठ्या प्रमाणावर बसला आहे.त्यातच बंदरात धोक्याचा इशारा देणारा तीन नंबरचा बावटा काल संध्याकाळी लावण्यात आला आहे.

त्यामुळे खबरदारीची उपाययोजना म्हणून गेटवे ऑफ इंडिया - एलिफंटा दरम्यानची लॉचसेवा बंद करण्यात आली आहे. लॉचसेवा बंद करण्यात आल्याने पर्यटक वाहतूक ठप्प झाली असल्याचे घारापुरी बंदर विभागाचे अधिकारी विनायक करंजे यांनी दिली. गेटवे ऑफ इंडिया येथुन जेएनपीए बंदराकडे प्रवाशांना घेऊन जाणारी सागरी सेवाही मंगळवारी संध्याकाळपासून बंद करण्यात आली आहे.

भाऊचा धक्का ते मोरा या सागरी मार्गावरुनही काल संध्याकाळपासूनच प्रवासी वाहतूक बंद करण्यात आली आहे.या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक कालपासूनच कोळमडली असल्याची माहिती मोरा बंदर विभागाचे अधिकारी प्रकाश कांदळकर यांनी दिली आहे.

करंजा- रेवस दरम्यानची तरसेवाही कालपासूनच बंद करण्यात आली आहे.वादळी ,खराब हवामानामुळे स्थानिक मासेमारीवरही विपरीत परिणाम झाला आहे. धोक्याच्या इशाऱ्यानंतर स्थानिक मासळी बाजारात मासळी मिळेनाशी झाली आहे.त्यामुळे मासळी खवय्यांचे हाल झाले आहेत.

विविध सागरी मार्गावरील पर्यटक, प्रवासी सेवा खंडित झाल्याने या सागरी मार्गावरुन दररोज प्रवास करणाऱ्या हजारो प्रवासी, पर्यटकांची गैरसोय झाली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सतरा वर्षीय तरुणीचा विनयभंग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अजिवली गावाजवळ १७ वर्षीय तरुणीचा विनयभंग केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १९ वर्षे तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

सतरा वर्षीय तरुणी ही त्यांच्या आई-वडिलांसोबत मोटरसायकलने पनवेल येथून चौक येथे जात होती. मुंबई पुणे जुना हायवेवरील आजिवली गावाजवळ ते आले असता मोटर कार क्रमांक एम एच ०२ डीजे ४६६३ वरील अनोळखी चालकाने या तरुनीकडे पाहून लैंगिक सतवणूक करण्याचा उद्देशाने अश्लील हावभाव केले. त्यामुळे या तरुणीने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## म्हसळा तालुक्यात धुँवाधार पाऊस १३ दिवसात ७५५ मि.मि. पावसाची नोंद ; १२ दुर्घटना

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात चालू पावसाळी हंगामात आजपर्यंत १२३८मि.मि.पावसाची नोंद झाली तालुक्याचे सरासरी पर्जन्यमाना च्या ३५.९३ %पावसाची नोंद झाली आहे. तालुक्यात १ जुलै पासून धुँवाधार पाऊस पडत आहे,१३ दिवसात ७५५ मि.मि. पावसाची नोंद झाली,आज दुपारी ११ ते १२च्या दरम्यान सोसाट्याच्या वाऱ्याने नागरीकाना निर्सग वादळाच्या आठवणीना उजाळा देऊन भितीचे वातावरण नागरिकांत झाले होते

तालुक्यात नैसर्गिक आपत्ती नुकसानीचा आज पर्यंत १२ घटनांची नोंद झाल्याचे निवासी नायब तह-सीलदार जी.एम्.तेलंगे यानी सांगितले. ते आंदाजे रु २,७४,४९०/- आसल्याचे तेलंगे यानी सांगितले.यामध्ये तालुक्यातील पाभरे,संदेरी ही दोनही धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत,सांडव्यावरून पाण्याचा विसर्ग होवू लागला आहे.

आपत्ती काळात तालुक्यांतील झालेली नुकसान पुढील प्रमाणे :पूर्णत पडलेली कच्चे घर १ (आडी महाड खाडी),अंशत: पडलेली पक्की घरे ४(आंबेत२,पाष्टी१,म्हसळा आदिवासीवाडी १), संडास /बाथरुम नुकसान ३ (मेंदडी, सुरई, वारळ ), विहीर कोसळणे १ (फळसप), घरा भोवतालची भिंत कोसळणे २ (आंबेत,वारळ) पशुधन हानी (मोठी जनावरे) २ (आंबेत शॉक लागून,संदेरी पुरांत वाहून),या कालावधींत कोणत्याही झोपड्यांची,गोठ्यांची पडझड झाली नाही ,जीवितहानी व जखमी व्यक्ती अहवाल (निरंक),सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान (निरंक).

म्हसळा तालुक्यात आपत्ती नियंत्रण कक्ष (तह-सील कार्यालय) येथे२४ तास सुरु आहे. काही आपत्ती झाल्यास कृपया पुढील क्रमांकावर ०२१४९- २३२२२४, मोबा. ८४५९७९५३२६,संपर्क साधावा असे अवाहन निवासी नायब तहसीलदार जी.एम्.तेलंगे यानी केले आहे.

## औषध विक्रेत्यास मारहाण प्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वाइप करून दोनशे रुपये रोकड न दिल्याने चार जणांनी एका औषध विक्रेत्यास बेदम मारहाण केली व दुकानात मोडतोड केल्याची घटना खांदेश्वर येथे घडली आहे. या बाबत चौघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास करीत आहेत. यातील फिर्यादी मोहनलाल चौधरी यांचे सुकापूर येथे मेडिकलचे दुकान आहे.

एक युवक औषध विक्रेत्याकडे आला व त्याने बँकेचे एटीएम कार्ड स्वाइप करून तुमच्या खात्यात २०० रुपये घ्या व मला २०० रुपयांची रोकड द्या अशी मागणी केली. मात्र, मोहनलाल यांनी वस्तू विकत घेतली तर तेवढ्याच पैशाचे स्वाइप होईल असे सांगितले. याचा राग येऊन त्याने अन्य एका युवकासह औषध विक्रेत्यास शिवीगाळ करीत मारहाण केली. त्यानंतर पुन्हा रात्री आणखी दोघे असे एकूण चौघे एकत्र आले व त्यांनी पुन्हा त्यास मारहाण करीत दुकानातील स्टूल घेत काचा फोडल्या. या प्रकरणी मोहनलाल यांनी स्वतःवर उपचार करून चार अज्ञात युवकांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## अजगराला सर्पमित्रांनी दिले जीवनदान

**दै.रायगड नगरी । उरण**

मोठे भोम येथील तुषार पाटील यांच्या घरा जवळील जाळ्यात अडकलेल्या अजगर जातीच्या सापाला सर्पमित्र राजेश पाटील यांनी जीवनदान दिले आहे.



सततच्या अतिवृष्टीमुळे कोकणा बरोबर उरण तालुक्यातील जनजीवन विस्कळित झाले आहे. त्यातच ठिक ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटनेत वाढ झाली असून भात शेती पाण्याखाली गेली आहे.त्यामुळे सरपटणारे प्राणी अन्नाच्या शोधात तसेच स्वतःच्या जीवाचे रक्षण करण्यासाठी नागरीकांच्या वस्ती कडे वळले आहेत.मोठे भोम येथील तुषार पाटील यांच्या घरा जवळील जाळ्यात भक्ष्याच्या शोधार्थ आलेला अजगर जातीचा साप अडकून पडला होता. यांची माहिती फ्रेंड्स ऑफ नेचर, चिरनेर चे अध्यक्ष तथा सर्पमित्र राजेश पाटील यांना देण्यात आली. सर्पमित्र राजेश पाटील यांनी जाळ्यात अडकलेल्या अजगराची सुटका करून डोंगर परिसरात अजगराला सोडून दिले आहे.

# पाली बस स्थानक नूतनीकरण कामास मिळणार गती, बसस्थानकाला येणार अच्छे दिन!

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महाराष्ट्रातील प्रख्यात अष्टविनायक तीर्थक्षेत्र व सुधागड तालुक्यातील मुख्यालयाचे ठिकाण असलेल्या पाली बसस्थानकाचे नूतनीकरण २ वर्षांपासून रखडले आहे.पाली बस स्थानक नूतनीकरण कामास आता गती मिळणार असल्याचे चित्र स्पष्ट झालेय. परिवहन अधिकाऱ्यांनी या संदर्भात ठोस निर्णय घेतलेत. पाली बस असून स्थानकाची प्रचंड दुरवस्था झाली. स्थानकाला विविध समस्यांनी ग्रासले आहे.



या सर्व बाबींसंदर्भात नुकतीच कार्यकारी अभियंता राज्य परिवहन महामंडळ मुंबई प्रदेश, विद्या भिलारकर व परिवहन महामंडळ विभाग नियंत्रक रायगड अनघा बारटक्के यांनी स्थानकाची प्रत्यक्ष पाहणी केली. व जुन्या ठेकेदाराला हटवून नवीन निविदा काढणार असल्याचे सांगितले. आणि सर्व समस्या मार्गी लावण्याची ग्वाही देखील दिली.

बसस्थानकाची जुनी इमारत तोडून एक वर्ष उलटून गेले तरी देखील नवीन इमारत अजूनही बांधण्यात आलेली नाही. पाली बस स्थानक नूतनीकरण व विविध समस्यांसंदर्भात सामाजिक कार्यकर्ते रवींद्रनाथ ओव्हाळ हे नियमित परिवहन मंडळाकडे उपोषण व निवेदनाच्या माध्यमातून पाठपुरावा करत आहेत. त्यांनी २ जुलै रोजी यासंबंधी परिवहन अधिकाऱ्यांची भेट घेतली होती. त्या अनुषंगाने परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी स्थानकात येऊन पाहणी केली आहे.

यावेळी कार्यकारी अभियंता राज्य परिवहन महामंडळ मुंबई प्रदेश, विद्या भिलारकर यांनी सांगितले की स्थानकाचे काम करण्यास ठेकेदार तयारच नसल्याने त्याच्या विरुद्ध कंत्राट रद्द करण्याबाबत प्रस्ताव मध्यवर्ती कचेरीस सादर केला आहे. त्यास लवकर मंजुरी प्राप्त करून नव्याने निविदा बोलावणे व नवीन ठेकेदार नेमण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्यास साधारण सहा महिन्याचा कालावधी लागणार आहे. तसेच चालू परिस्थितीनुसार भाव देखील वाढविण्यात येणार आहेत. सुरुवातीला २ कोटी ३६ लाखांचे असलेले एकूण काम आता साधारण साडे तीन ते साडेचार लाखांवर जाऊ शकते. मात्र आराखडा (प्लॅन) तोच राहणार आहे. असे भिलारकर म्हणाल्या.

स्थानक आवारामध्ये मोठ्या प्रमाणात चिखल व घाण पाणी साचत या संदर्भात पाली नगरपंचायतीने तोडलेल्या गटाराच्या स्लॅब बाबत पाठपुरावा करून नगरपंचायतीकडून काम करून घेण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे. तसेच यावेळी नगरपंचायतमध्ये भेट देण्यात आली. स्थानकाच्या आवारात बाहेरचे सर्व पाणी येते. त्यासाठी स्थानकाच्या जागेच्या भोवताली गटार योजना करण्यासाठी आमदार निधीतून काम करून देण्यासंदर्भात पाठपुरावा करण्यात येणार आहे. नव्याने बांधलेले स्वच्छतागृहाची स्वच्छता करण्यासंदर्भात एका संस्थेची नेमणूक करण्यात येईल.

स्थानकाच्या आवारात पडलेले खड्डे, प्रवाशांना पिण्याचे पाणी यासंदर्भात लागलीच उपाययोजना करण्यात येणार आहे. तसेच कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातील असे आश्वासन विद्या भिलारकर यांनी दिले.

## आगरदांडा - दिघी बंदरात तीन नंबरचा बावटा : जलवाहतूक सेवा बंद

**दै.रायगड नगरी । मुरुड**

गेल्या दोन दिवसांपासून पडणारा मुसळधार पाऊस वादळी वारे याचा फटका जलवाहतूक सेवेला सुद्धा बसला असून हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्या नूसार समुद्रकिनारी तीन नंबरचा बावटा लावला असल्याने समुद्र किनारी जोरदार वारे वाहून मुसळधार पावसाची शक्यता असल्याने आहे. आगरदांडा ते दिघी जलवाहतूक प्रवाशांच्या सुरक्षेसाठी दि. १४ जुलै रोजी दुपारी ३:३० नंतर बंद करण्यात आली. ही जलवाहतूक सेवा १५ जुलै रोजी नेहमी प्रमाणे सुरू करण्यात येणार असल्याचे दिघी जलवाहतूक सोसायटी कडून सांगण्यात आले आहे. याचा या ठिकाणी दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर परिणाम झाला.



आगरदांडा-दिघी बंदरातील जलवाहतूक प्रवाशांच्या सुरक्षेसाठी बंद करण्यात आली

## रोह्यात साथीच्या आजारात वाढ ; अनेकांना डेंग्यूची लागण

**दै.रायगड नगरी । धाटाव**

जून महिन्याच्या अखेरीस पावसाने सुरुवात केल्याने रोह्यासह लगतच्या परिसरात विविध ठिकाणी डबक्यात साठलेल्या सांडपाण्याचा प्रभाव सर्वत्र पडला.या सांडपाण्यामुळे डेंग्यूच्या आळ्यामुळे अखेर रोह्यालगत वरसेत अनेकांना डेंग्यूने अक्षरशः घेरले.यामुळे डेंग्यूच्या साथीची अधिकच भर पडल्याने जाधव नर्सिंग होम यांसह अनेक दवाखाने अक्षरशः फुल्ल भरल्याचे गंभीर चित्र समोर आले.

डेंग्यू डासांचा प्रादुर्भाव रोखण्यात तालुका आरोग्य प्रशासन अक्षरशः अपयशी ठरत असल्याचे पहावयास मिळाले. रोहा तालुक्यात साथीच्या आजारात मोठी वाढ झाली. असंख्य लहान मुलेही आजारी पडल्याचे समोर आले. त्यात डेंग्यूने डोके वर काढल्याने आरोग्य प्रशासन आतातरी गांभीर्याने उपायोजना करेल का ? हे पाहावे लागणार आहे.

दरम्यान वरसेतील अनेक इमारतींच्या बांधकाम डबक्यांत डासांच्या मोठ्या प्रमाणात आळ्या आढळल्याने प्रशासन सतर्क झाल्याचे दाखवत असले तरी फवारणी व अन्य उपाययोजनेकडे गांभीर्याने पाहत असल्याचे दिसत नाही तर डेंग्यूंच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क रहावे असे आवाहन तालुका आरोग्य व ग्रामपंचायत प्रशासनाने केले आहे.

वरसे ग्रामपंचायतमधील भुवनेश्वर , आदर्शनगर, गणेशनगर, वरसे विभागात डेंग्यूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने एकच खळबळ उडाली. गणेशनगर परिसरातील इमारतीच्या आवारात विविध बांधकामासाठी खोदण्यात आलेल्या डबक्यात डासांच्या आळ्या आढळून आल्या. याच परिसरातील नागरिक, लहान मुलांना डेंग्यूने घेरल्याचे अनेकदा समोर आले. अनेक खाजगी रुग्णालयात दाखल होऊन उपचार घ्यावे लागले. आता लहान डेंग्यू सदृश्य तापाची लक्षणे दिसत असल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

## पनवेल शहरातून रिक्षाची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील दत्तइन हॉटेल च्या बाजूला असलेल्या फुलाच्या दुकानाजवळ मोकळ्या जागेत उभी करून ठेवलेली रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे .

विजय वाहुलकर यांची ८० हजार रुपये किमतीची काळ्या-पिवळ्या रंगाची बजाज कंपनीची एम एच ४६ - बी डी ५३०४ ही वरील ठिकाणी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर रिक्षा करून नेल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे : पनवेल येथील सिटी सर्व्हे नं.४९७, ४९८, ४९८/१-३, ४९९, ४९९/१-२ मधील असलेले इमारतीचे नांव : अयोध्या रजि. सोसायटीचे नांव : शकुन को.ऑप.हौ.सोसायटी मधील गाळा क्र.१, क्षेत्र १३० चौ.फूट कारपेट, तळ मजला, कापड बाजार, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड हे वाणिज्य गाळे आमचे अशिल श्री.आरिश गुलाम हुसैन मुल्ला, रा.घर नं.१०९, पटेल मोहल्ला, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांचे मालकीची व त्यांचे प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील आहे. सदरचा गाळा श्री.आरीश गुलाम हुसैन मुल्ला यांनी श्री.संजय प्रभाकर मेहेर यांचेकडून दि.०८/०९/२००४ रोजीचे करारनाम्याने खरेदी केली होती. सदरचा करारनामा मे.दुय्यम निबंधक साहेब पनवेल यांचे कार्यालयात अ.क्र.६४९६/२००४ कडे नोंदणीकृत केले आहे.

तसेच श्री.संजय प्रभाकर मेहेर यांना सदरचा गाळा श्री.रविंद्र सदाशिव सुर्यराव, रा.कळवा, ठाणे यांचेकडून दि.१०/०५/२००२ रोजीचे भाडेकरूस नवीन इमारतीत जागा मालकी तत्वावर देण्याबाबतचा करारनाम्या अन्वये मिळालेले आहे. सदरचा करारनामा मे.दुय्यम निबंधक साहेब पनवेल यांचे कार्यालयात अ.क्र.०१०५०/२००२ कडे नोंदणीकृत केले आाहे.

तसेच दि.१०/०५/२००२ रोजीच्या करारनाम्याची मुळ प्रत आमचे अशिलांचे ताब्यात असताना दि.१०/०५/२०२२ रोजी भाजी मार्केट, पनवेल येथे हरवली/गहाळ झाली आहे. त्यांनी शक्यतोवर सर्व ठिकाणी शोध घेतला. परंतु त्यांना सदरहू करारनाम्याची प्रत कोठेही सापडली नाही / आढळून आली नाही. आमचे अशिलांनी सदरील करारनाम्याची मुळ प्रत हरवले / गहाळ झालेबाबतची तक्रार मे.ठाणे अंमलदार, पनवेल पोलीस ठाणे, पनवेल यांचेकडे दि.०७/०७/२०२२ रोजी नोंदविली असून त्याचा क्र.१३३९/२०२२ असा आहे. सदर करारनाम्याची मुळ प्रत त्यांनी कोणाही व्यक्तीकडे, बँकेकडे अथवा संस्थेकडे तारण, गहाण ठेवलेली नाही.

तरी सदर कररारनाम्याची मुळ प्रत कोणालाही सापडल्यास त्यांनी खाली दिलेल्या पत्यावर अगर मोबाईल नंबरवर त्वरित संपर्क साधावा. तसेच सदर गाळेवर अन्य कुणाचाही गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, कुळ वहिवाट, वापर, वहिवाटीचा हक्क, इजमेंट, ताबा, बोजा-चार्ज, अॅटॅचमेंट, मनाई आदेश, दंग-दावा, साठेकरार अगर अन्य कोणत्याही मार्गाने हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्तींनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत स्वतःचे हक्क हितसंबंधाविषयी सकृतदर्शनी पुराव्यासह आमच्या खालील पत्यावर आपल्या लेखी हरकती स्वतः अगर प्रतिनिधीमार्फत सादर कराव्यात किंवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर गाळा हा निर्वेध व बोजारहीत आहे असे समजले जाईल व त्यानंतर आलेल्या हरकती गृहीत धरल्या जाणार नाहीत. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी, हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.१६/०७/२०२२

सही/-
**अॅड.आबिदा शाहनवाज हकीम**
**(अॅडव्होकेट हायकोर्ट)**
**मु.पो.बारापाडा, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८४३३५२६१७३**



**अॅड.प्रिती जगदीश भारती**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.तिसरे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९८१/२०२२
नि.नं.९/ड
ने.ता.१७/०८/२०२२

१) श्री.निलेश घनश्याम राऊत पाटील
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) श्रीमती.निलम घनश्याम राऊत पाटील
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
अर्जदार क्र.१ ते २ रा.सदनिका क्र.बी-२०४,
७ वा मजला, सत्यकेतू कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.९,
सेक्टर ३५, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०९
३) सौ.निकिता जयकुमार पुजारी
वय : ३२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.रुम नं.५, बिल्डींग नं.५२ मागे, आचार्य कॉलेज
जवळ, सुभाष नगर, चेंबुर, मुंबई ४०००७१ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात कै.घनश्याम शंकर राऊत पाटील यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. कै.घनश्याम शंकर राऊत पाटील यांचा मृत्यू दि.०४/०५/२०२१ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेला आहे. कै.घनश्याम शंकर राऊत पाटील हे हयातीत असताना कै.घनश्याम शंकर राऊत पाटील यांनी दि.१०/०५/२०१० रोजी रजिस्टर करारनामाने खालील मिळकत :-

**सदनिका क्र.बी-२०४, २ रा माळा, सत्यकेतू कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.९, सेक्टर ३५, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०९ येथे क्षेत्रफळ ३८.५१ चौ.मी. कारपेट सदनिका विकत घेतलेली आहे. सदरचा करारनामा उरण अनु क्र.०४८२३/२०१० कडे मा.दुय्यम निबंधक पनवेल २ यांच्या कार्यालयात दि.१०/०५/२०१० रोजी नोंदविलेला आहे. सदर मिळकतीवर वारस म्हणून नोंद घेण्याकरिता अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे.**

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारसा हक्काबाबत कोणाची हरकत, अधिकार अथवा वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपल्या हरकती या योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या मुदतीत कोणाच्या हरकती न आल्यास, कोणाचीही हरकत नाही असे असे समजून अर्जदारास वारस दाखला देण्यात येईल. मागाहून आलेल्या हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.

आज दि.०१ माहे जुलै २०२२ आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गोडसे सा०

**अॅड.प्रिती जगदीश भारती**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९९६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१७/०८/२०२२

१) सौ.गीताबाई बाळाजी आढाव
वय : ७० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्रीमती.सोनाली अनिल आढाव
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
३) कु.अनुष्का अनिल आढाव
वय : १२ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
अ.पा.क.आई
श्रीमती.सोनाली अनिल आढाव
वरील १ व ३ रा.५०१/अ, आशिर्वाद बिल्डींग,
रुम नं.६१ व १२९, एन.एम.जोशी
मार्ग, भायखळा, मुंबई ४०००११ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात कै.अनिल बाळाजी आढाव यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. कै.अनिल बाळाजी आढाव यांचा मृत्यू दि.२८/०४/२०२१ रोजी साईदीप हेल्थकेअर रिसर्च प्रा.लि. अहमदनगर येथे झाला आहे. कै.अनिल बाळाजी आढाव हे हयातीत असताना खालील वर्णनाच्या सदनिका विकत घेतलेली आहे.

| अ. क्र. | मिळकतीचे वर्णन |
|---|---|
| १ | कै.अनिल बाळाजी आढाव यांनी दि.२८/०६/२०१७ रोजी मे.सुप्रिम कन्स्ट्रक्शन अॅड डेव्हलोपर्स प्रा.लि. यांच्याकडून रजिस्टर करारनामाने सदनिका क्र.२२०३, २२ वा माळा, टॉवर क्र.०८, ईमर्ल्ड बिल्डींग, रोहिंजण, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्रफळ ३६० चौ.फूट कारपेट अधिक ३७.०० चौ.फूट बाल्कनी सदनिका विकत घेतलेली आहे. सदरचा करारनामा अनु.क्र.४३३३/२०१७ कडे मा.दुय्यम निबंधक पनवेल ३ यांच्या कार्यालयात दि.२८/०६/२०१७ रोजी नोंदविलेला आहे. |
| २ | कै.अनिल बाळाजी आढाव व श्री.बाळाजी केशव आढाव यांनी दि.१७/१२/२००९ रोजी मे.कोहिनुर एंटरप्रायझेस तर्फे प्रो.लक्ष्मीप्रसाद अनंत देसाई यांच्याकडून रजिस्टर करारनामाने सदनिका क्र.६०४, ६ वा माळा, कोहिनुर एनक्लेव्ह, प्लॉट क्र.१८, सेक्टर १०, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे क्षेत्रफळ ३९७.३५ चौ.फूट बिल्टअप अधिक २.०४३ चौ.मी. टेरेस सदनिका विकत घेतलेली आहे. सदरचा करारनामा अनु.क्र.८७५८/२००९ कडे मा.दुय्यम निबंधक पनवेल ३ यांच्या कार्यालयात दि.१७/१२/२००९ रोजी नोंदविलेला आहे. (सदर मिळकती मधील कै.अनिल बाळाजी आढाव यांच्या ५० टक्के हक्काकरिता) |
| ३ | श्री.संजय बाळाजी आढाव व कै.अनिल बाळाजी आढाव यांनी दि.१०/०८/२०१८ रोजी मे.रिद्धी सिद्धी कॉर्पोरेशन पार्टनरशिप फर्म यांच्याकडून रजिस्टर करारनाम्याने सदनिका क्र.डी-९०४, ९ वा माळा, डी विंग, ए. अॅड. ओ. एक्सेलेन्ट, राजेंद्रप्रसाद रोड, मुलुंड (प.), ता.कुर्ला, जि.मुंबई येथे क्षेत्रफळ ३५३.१७ चौ.फूट कारपेट सदनिका विकत घेतलेली आहे. सदरचा करारनामा अनु क्र.११०२८/२०१८ कडे मा.सह दुय्यम निबंधक करल ५ यांच्या कार्यालयात दि.१०/०८/२०१८ रोजी नोंदविलेला आहे. (सदर मिळकती मधील कै.अनिल बाळाजी आढाव यांच्या ५० टक्के हक्काकरिता) |
| ४ | कै.अनिल बाळाजी आढाव व श्री.संजय बाळाजी आढाव यांनी दि.१०/०८/२०१८ रोजी मे.रिद्धी सिद्धी कॉर्पोरेशन पार्टनरशिप फर्म यांच्याकडून रजिस्टर करारनाम्याने सदनिका क्र.डी-९०५, ९ वा माळा, डी विंग, ए. अॅड. ओ. एक्सेलेन्ट, राजेंद्रप्रसाद रोड, मुलुंड (प.), ता.कुर्ला, जि.मुंबई येथे क्षेत्रफळ ३५३.१७ चौ.फूट कारपेट सदनिका विकत घेतलेली आहे. सदरचा करारनामा अनु क्र.११०३०/२०१८ कडे मा.सह दुय्यम निबंधक करल ५ यांच्या कार्यालयात दि.१०/०८/२०१८ रोजी नोंदविलेला आहे. (सदर मिळकती मधील कै.अनिल बाळाजी आढाव यांच्या ५० टक्के हक्काकरिता) |

सदर मिळकतीवर वारस म्हणून नोंद घेण्याकरिता अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारसाहक्काबाबत कोणाची हरकत, अधिकार अथवा वारसा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपल्या हरकती या योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या मुदतीत कोणाच्या हरकती न आल्यास, कोणाचीही हरकत नाही असे असे समजून अर्जदारास वारस दाखला देण्यात येईल. मागाहून आलेल्या हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.

आज दि.१४ माहे जुलै २०२२ आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## लोखंडी अँगलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१० हजार रुपये किमतीच्या १० लोखंडी अँगलची चोरी झाल्याची घटना तालुक्यातील शेडुंग येथील सुधीर शेट्टी फार्म येथे घडली आहे. निकेश पालकर हे देखभाल करीत असलेल्या सुधीर शेट्टी फार्म हाऊस च्या सुरक्षेसाठी दगडी भिंतीवर लावलेले १० हजार रुपये किमतीच्या १० लोखंडी अँगलची चोरी झाल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## घरफोडीत १ लाख ४०हजार रुपये किमतीचे दागिने केले लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात इसमाने बंद घराचे लॉक उघडून घरामध्ये असलेले जवळपास १ लाख ४०हजार रुपये किमतीचे दागिने लंपास केल्याची घटना तालुक्यातील वाकडी गावच्या हद्दीत घडली आहे .

येथील ग्रीन एकर सोसायटी मध्ये राहणारे मुकेश पांचाळ यांचे घर बंद असताना व त्यांनी घराच्या चाव्या सदर सोसायटी मधील एक ओळखीच्या घरात दिल्या होत्या , दरम्यान अज्ञात इसमाने बंद घराचे लॉक उघडून घरामध्ये असलेले जवळपास १ लाख ४०हजार रुपये किमतीचे दागिने लंपास केल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अल्पवयीन मुलाचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलाचे मुलाचे अपहरण झाल्याची घटना पनवेल जवळील उसर्ली गाव येथून घडली आहे .

राहुलकुमार सुधीर मंडल असे त्याचे नाव असून त्याची उंची अंदाजे ४ फूट , अंगाने सडपातळ , रंग काळा , चेहरा गोल , नाक छोटे पसरट , डोळे काळे , केस लहान , दोन्ही पाय वाकडे असून अंगात लाल रंगाचा हाफ टीशर्ट व निळ्या रंगाची हाफ पँट घातली आहे. त्याला हिंदी भाषा आवगत आहे . या मुलांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे फोन – ०२२-२७४५२३३३ किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेटे यांच्याशी संपर्क साधावा .


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# जावेळे पूल कधी बनणार? ग्रामस्थांचा सवाल

## पावसाळी पर्यायी मार्गाला तडे, प्रवास बनला धोकादायक

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील जावेळे येथील नदीवरील पडलेल्या पुलाच्या बांधणीचा प्रश्न दोन वर्षे उलटूनही अद्याप अडकून पडला आहे. सध्या पावसाळ्यात पाण्याखाली आलेल्या पर्यायी मार्गाला तडा गेल्याने हा रस्ता ओलांडणे आता ग्रामस्थांना धोकादायक ठरत आहे.

जावेळे येथील नदीवरील हा पूल २५ ऑगस्ट २०20 मध्ये पावसाळ्यात अचानक कोसळला, तालुक्यातील नदीपलीकडचा भाग डोंगराळ असून, विशेषतः रायगड व रत्नागिरी जिल्ह्याला जोडणारा मार्ग आहे. या मार्गावरील वाहने श्रीवर्धन ते गालसुरे पुढे आंबेतमार्गे रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड येथे पोहचतात. येथील वडशेत, वावे, साखरोने व धारवली या गावाकडे जाण्यासाठी पक्क्या स्वरुपाचा मार्ग नाही. त्यामुळे नदीवर पूल बांधण्यात यावा, अशी मागणी तेथील ग्रामस्थ सातत्याने करीत आहेत. त्याबाबत शासनाकडे लेखी स्वरुपात पाठपुरावा केला गेला.



श्रीवर्धनकडे जाणारा पूल दोन वर्षांपूर्वी अचानक कोसळून पडला होता. हा पूल जिल्हा परिषदच्या अखात्यारीत्या असल्याने पुलाच्या पुनर्बांधणीसाठी संबंधित जिल्हा परिषद विभाग तसेच याला पर्याय म्हणून बांधकाम विभागाकडे अनेक वेळा पत्रव्यवहार करण्यात आले. पण, अजून पूल काही मार्गी लागलेला नाही. त्यावेळी नदीपलीकडे जाण्यासाठी मोऱ्या टाकून पर्यायी मार्ग तयार केला खरा मात्र, तो देखील सुरक्षित नाही. या पावसाळी दिवसात मार्गावर पुराचा वेढा पडत असतो. त्यामुळे सद्यस्थितीत वाहतूक तसेच येणे जाण ठप्प होत आहे. नदी पलीकडे असणाऱ्या वडशेत, वावे, साखरोने आणि धारवली या गावांना पडलेल्या पुलामुळे अडचण झाली आहे. यंदा तरी पावसाळ्या पूर्वीच या पुलाचे काम होणे गरजेचे होते, येथील ग्रामस्थ व विद्यार्थ्यांचे खूप नुकसान होत आहे.

सध्या अतिवृष्टीमुळे पर्यायी रस्त्यावर पाणी येत असल्याने मार्ग बंद झाल्यावर अनेक अडचणींचा सामना करावा लागतं आहे. नेहमीच दैनंदिन खरेदीसह, शालेय विद्यार्थी तसेच रुग्ण यांना सहा किलोमीटर अंतरात पायपीट करत वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. पावसाळ्यात पर्यायी पुलावरून श्रीवर्धनकडे जाण्यासाठी येथील आडी, वडशेत, वावे, साखरोने, धारवली येथील ग्रामस्थांना कोलमांडला, बागमांडला असा उलट – सुलट प्रवास १५ किलोमीटर जास्तीचा करावा लागत आहे. ग्रामस्थांच्या मागणीनुसार या रस्त्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नाबार्ड योजनेअंतर्गत प्रस्ताव देण्यात आला. मात्र, तोही नामंजूर झाले. गाफील प्रशासन – पुलाच्या दुरीस्तीसंबंधी सध्यस्थिती जाणण्यासाठी श्रीवर्धन येथील जिल्हा परिषद विभागाशी संपर्क केला असता, संजय डोंगरे शाखा अभियंता यांच्याशी वारंवार संपर्क करून देखील संपर्क होऊ शकला नाही.

## भेंडखळ येथील श्री जरी मरीआई नवरात्रौत्सव मंडळ धावले जांभूळपाडा दुर्घटना मदतीला



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जांभूळपाडा कातकरी वाडीतील राम कातकरी यांचा अतिवृष्टीमुळे अंगावर घर पडून मृत्यू झाला. तसेच घरातील इतर सदस्य जखमी झाले होते. राहते घर पडल्यामुळे सध्या स्थितीला कातकरी कुटुंबाची परिस्थिती खूपच वाईट आणि हलाखीची झालेली आहे. आपण या समाजाने काही देणं लागतो यावृत्तीमुळे भेंडखळ येथील श्री जरी मरीआई नवरात्रौत्सव मंडळाने जांभूळपाडा कातकरी वाडी येथील दुर्घटनाग्रस्तांच्या कुटुंबाला एक महिन्याचे राशन तसेच जीवनावश्यक वस्तूं दिल्या आहेत.

तसेच श्री जरी मरीआई नवरात्रौत्सव मंडळाने उरण वासियांना वासीयांना आवाहन सुद्धा केले आहे की, आपण या समाजाचे काही देणं लागतो. आपण माणुसकी म्हणून २००–३०० किलोमीटर दूर जाऊन कोल्हापूर, महाड येथे पूरग्रस्तांना भरभरून मदत केली व त्यांना आधार देऊन माणुसकीचे दर्शन दिले. पण आजची परिस्थिती बिकट आहे. प्रत्यक्षात आपल्या उरणमध्ये अशी दुर्दैवी घटना घडली. सदर दुर्घटनाग्रस्थांना सध्या अंगावर घालायला कपडे नाहीत, ना राशन, ना जेवण शिजवायला भांडी. जे होते नव्हते ते पडक्या घरात दबून गेले. सध्या ते अंदाजे १०'द१४' च्या गावातील पर्यायी खोलीत तात्पुरते राहत आहेत. म्हणून ज्याला जमेल त्यांनी जांभूळपाडा वाडीवर जाऊन सदर दुर्घटनाग्रस्तांची मदत करावी.

## शिवसेनेच्या दणक्यानंतर कामोठे वसाहती मधील पाणी प्रश्न सुटणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीमध्ये पाणी प्रश्न खुप भेडसावत होता , यासंदर्भात जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी रायगड भवन येथे पाणी प्रश्नावर संबंधीत अधिकाऱ्यां बरोबर बैठक घेऊन ''आम्हास फक्त आश्वासन नको रिजल्ट पाहिजे आशी ठाम भुमिका घेतल्यामुळे येत्या दोन दिवसात पाणी प्रश्न सोडविण्याचे आश्वासन संबंधीत अधिकाऱ्यानी दिल्या मुळे कामोठे वसाहतीमधील पाण्याचा प्रश्न निकाली निघणार आहे .

संपूर्ण कामोठे शहरा मध्ये आणि जास्त करुन सेक्टर १७,१८,३४,३५ आणि ३६ येथे गेल्या २ महिन्यांपासून पाणी प्रश्न खुप भेडसावत आसताना कामोठे नोड च्या अधिकाऱ्यां कडून हा प्रश्न सुटत नसल्याने जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या उपस्थितीत रायगड भवन येथे पाणी प्रश्नावर जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांची अधिकाऱ्यां बरोबर एक तास चर्चा झाली आम्हास फक्त आश्वासन नको रिजल्ट पाहिजे आशी ठाम भुमिका जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी व सर्व पदाधिकाऱ्यांनी घेतली. येत्या या दोनच दिवसांत याचा रिजल्ट दिसून समाधानकारक पाणी कामोठे मधील नागरिकांना मिळेल अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली. यावेळी कामोठे विभाग प्रमुख बबन गोगावले यांच पत्र देण्यात आले.यावेळी विभाग प्रमुख बबन गोगावले, उप विभाग प्रमुख संजय जंगम, उप विभाग प्रमुख सचिन त्रिमुखे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ.अनिकेत तटकरे यांच्या प्रयत्नातून मुठवली खु.येथे बसविण्यात आली विद्युत डिपी

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे ठिकठिकाणी विद्युत समस्येचा सामना करावा लागत आहे. अशातच रोहे तालुक्यातील मुठवली खु.येथे विद्युत डिपीच उडाल्याने संपुर्ण गाव अंधारात गेला होता.या वीज समस्येच्या संकटसमयी आ.अनिकेत तटकरे यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे गावातील विद्युत पुरवठा पुर्ववत झाल्याने ग्रामस्थांची विद्युत समस्येपासून सुटका झाली.

सध्या सर्वत्र होत असलेली मुसळधार पर्जन्यवृष्टी व अधून मधून वाहणारे वारे यांचा सर्वच क्षेत्राला फटका बसत आहे.तर वा–या पावसात विद्युत सहमस्याही निर्माण होत असल्याने नागरिकांना विद्युत समस्येच्या संकटाला सामोरे जावे लागत आहे.तर मुठवली खु.येथे मागील आठवड्यात मुसळधार पावसामुळे विद्युत डिपीच उडाल्याने पुर्ण गाव अंधारात गेला होता.अशावेळी युवकांचे प्रेरणास्थान व संकटसमयात धाऊन येणारे आमदार म्हणून अनुभवास आ.अनिकेत तटकरे यांच्याशी येथील युवा कार्यकर्ते महेश तुपकर यांनी संपर्क साधून आपली समस्या सांगितली. अशावेळी आ.अनिकेत तटकरे यांनी क्षणाचाही विलंब न लावता विद्युम मंडळ अधिकारी वर्गाशी संपर्क साधल्याने यंत्रणा कामाला लागली.संपुर्ण मुठवली खु.ग्रामस्थ व तरूण मंडळ यांच्या सहकार्याने विदृयुत य़त्रणेने प्रयत्नांची पराकाष्ठा करून केवल चार ते पाच तासांच्या मेहनतीने विदृयुत डिपी बसवून विद्युत पुरवठा पुर्ववत करण्यात यश मिळविले.

## रुपयाचा रेव्हेन्यू स्टॅम्प दोन रुपयांना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रेव्हेन्यू स्टॅम्प एक रुपयाचा असला, तरी त्याच्यावाचून अनेक कायदेशीर कामे खोळंबतात. विविध सरकारी कामांसाठी एक रुपयाच्या स्टॅम्प ची गरज भासते. ते पोस्टात उपलब्ध नसल्याने कोर्टात जाऊन रांगेत उभे राहावे लागत असल्याने नागरिक वैतागले आहेत. शहरातील छोट्या–मोठ्या दुकानांमध्येही रेव्हेन्यू स्टॅम्प्स नाहीत. मोठी पायपीट करून एखाद्या दुकानात रेव्हेन्यू स्टॅम्प मिळाल्यास एक रुपयाचा स्टॅम्प दोन रुपयाला घ्यावा लागत आहे. म्हणजेच सरकार व पोस्टाच्या गैरकारभारामुळे नागरिकांची भर उन्हात पायपीट तर होत आहेच, परंतु वेळ व पैशाचाही अपव्यय होत आहे. एवढ्या नागरिकांना परत पाठविण्याएवजी पोस्टानेच कोर्टातून रेव्हेन्यू स्टॅम्प आणावेत, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

राज्यभरात रेव्हेन्यू स्टॅम्प चा तुटवडा आहे. त्यामुळे अवाच्या सव्वा भावात त्याची विक्री केली जात आहे. गेल्या काही महिन्यांपासून रेव्हेन्यू स्टॅम्पचा तुटवडा निर्माण झाला आहे. छपाई करणाऱ्या कंपनीबरोबरच्या कराराची मुदत ३१ डिसेंबर रोजी संपली आहे.

करार संपण्याअगोदर छपाई झालेली तिकिटे काही दिवस उपलब्ध होत होती. सहा महिन्यांत मात्र छपाई थांबल्याने गेल्या दोन महिन्यांपासून तिकिटांचा तुटवडा झाला आहे.

बरयाच ठिकाणी एक रुपयांचा रेव्हेन्यू स्टॅम्प दोन रुपयांना विकला जात असल्याचे समोर आले आहे. ही एक प्रकारची लूट आहे. आर्थिक करार, कर्ज देवघेव आणि घर भाड्याने देण्याचे करार, शासकीय कार्यालयात देण्यात येणारी विविध योजनांची रक्कम भरताना, लहान–मोठ्या व्यवहारासाठी एक रुपयाचे पावती तिकीट आवश्यक असते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून ही तिकिटे मिळण्यात अडचणी येत आहेत. ही तिकिटे न मिळाल्याने अनेकांना आर्थिक झळ सोसावी लागत आहे.

## उंबराचे झाड कोसळल्याने कारचे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी मध्ये एक उंबराचे झाड कोसळल्याची घटना १३ जुलै रोजी दुपारच्या सुमारास घडली.

शहरातील प्लॉट नंबर ४९ ,सार–स्वत बँकेच्या मागे असलेले उंबराचे मोठे झाड एका गाडीवर कोसळले यात चार चाकी गाडीचे नुकसान झाले आहे. या उंबरा सोबतच कंपाउंड वॉल देखील कोसळली आहे.

मुसळधार पावसामुळे हे झाड उन्मळून पडले पनवेल परिसरात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे त्याचा फटका नागरिकांना बसत आहे.

अग्निशामक दलाच्या जवानांनी हे झाड कटिंग करून बाजूला केले यावेळी हा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता.

## वर्षावास प्रवचन मालिका उदघाटन सोहळा उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

बुधवार दि. १३ जुलै, २०२२ रोजी भारतीय बौध्द महासभा रायगड जिल्हा दक्षिण विभाग यांचे वतीने व तालुका शाखा पोलादपुर, महाड, माणगांव, माणगांव शहर, तळा,रोहा,म्हसळा व श्रीवर्धन येथील बहुसंख्य उपासक, उपासिका यांच्या उपस्थितीत दु.१२.३० वाजता बुध्द लेणी कुडे, ता. तळा येथे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष अनिल मोरे यांचे अध्यक्षते खाली बहुसंख्य जिल्हा व तालुका पदाधिकारी, केंद्रिय शिक्षिक/ शिक्षका, मा. श्रामणेर, बौध्दाचार्य, समता सैनिक, लेणी संवर्धक यांचे उपस्थित वर्षावास प्रवचन मालिकेचा उदघाटन समारंभ संपन्न झाला.





प्रथमतः समता सैनिक दलाच्या वतीने बुद्ध लेणीला मानवंदना देण्यात आली. यावेळी तळा तालुक्यातील महिला समता सैनिक बहुसंख्येने उपस्थित होते . या प्रसंगी जिल्ह्यातील इयत्ता १२ वी व १० वी आणि पदवीधर उत्तीर्ण विद्यार्थी यांचा गुणगौरव मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. या वेळी धम्मगुरु भन्ते प्रज्ञाज्योती उपस्थित होते. सदर मालिकेचे उदघाटन जिल्हा अध्यक्ष अनिल मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी रायगड जिल्हा माजी अध्यक्ष नितीन मोरे व विजय सोनू जाधव हे उपस्थित होते. यावेळी संस्कार विभाग उपाध्यक्ष अशोक काटे सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा पदाधिकारी आणि सर्व तालुक्यातील पदाधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना उपस्थितांना आ–षाढ पोर्णिमीच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास दक्षिण रायगड जिल्ह्या–तील भारतीय बौद्ध महासभा व बौद्धजन पंचायत समितीचे पदाधिकारी व सभासद बंधू, भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे व्यवस्थापन व स्वागत समारंभ तसेच उपस्थितांना भोजनदान तालुका शाखा तळा यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस संतोष जाधव यांनी केले तर स्वागत सूत्रसंचालन आणि आभार तळा सरचिटणीस प्रकाश गायकवाड यांनी केले.

## श्री स्वामी समर्थ मठ पळसदरी येथे गुरुपौर्णिमा हर्षोल्हासात साजरी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

पळसदरी येथील श्री स्वामी समर्थ मठात गुरुपौर्णिमा हर्षोल्हासात साजरी करण्यात आली.



सकाळी अभिषेक, दत्त याग, तसेच दुपारीआरती, महाप्रसाद व मठाचे मठाधिपती स्व. दादा दरेकर यांचे ज्येष्ठ पुत्र विक्रांत दरेकर नित्यनेमाने सेवा करणा–या वत्सला वांजळे, विजु दरेकर, नितीन चिंदरकर, निलेश सुर्वे, महेश कानिटकर, आदीं सेवेक–यांचा तसेच खजिनदार भानू काका शिंदे, महाप्रसाद बनविणारे आचारी शंकर पवार, सखाराम पवार, मठ परिसर स्वच्छ ठेवणारे स्वच्छता दुत, तसेच कर्मचारी दिलीप पांडे, दादू दरेकर, सदानंद लोखंडे, देवेंद्र तांबे, आदींचा गुरुपौर्णिमा अन्नदान मित्र परिवाराच्या वतिने कृतज्ञतापूर्वक शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. २००४ सालापासून गुरुपौर्णिमा अन्नदान मित्र परिवाराच्या वतिने प्रतिवर्षी मठात महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते.गेली दोन वर्षे कोविड महामारीच्या संकटामधे शासनबंदीमुळे गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली नव्हती, त्यामुळे काल धुवाधार अतिवृष्टी असूनही मोठ्या प्रमाणात स्वामी भक्तांनी दर्शनाचा तसेच महाप्रसादाचा लाभ घेतला. याप्रसंगी कर्जत नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, माजी नगरसेविका अरुणा वायकर यांना शाल श्रीफळ देण्यात आले. याप्रसंगी वकील राजेंद्र निगुडकर, राजू पोतदार, अशोक शितोळे, दिपक कुलकर्णी, सचिन दरेकर, प्रमोद दानवे, मंगेश शिंदे, सुभाष पाटील, तसेच मोठ्या संख्येने स्वामी भक्त उपस्थित होते.

## सर्वे डोंगराचा ढस धोकादायक : दगड-माती रस्त्यावर येऊन अपघाताची शक्यता?

### फणसाड अभयारण्य विभागाने उपाययोजना करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड जिल्हयामध्ये सद्यस्थितीमध्ये मुसळधार पाऊस होत असून तसेच भारतीय हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार दिनांक १४ जुलै पर्यंत पर्यत रायगड जिल्हयाला अति ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आलेला आहे.

गेली दोन दिवस जोरदार पडत असलेल्या पावसाने अलिबाग–मुरुड रस्त्यावर दांडा ते सर्वे दरम्यान रस्त्यावर फणसाड अभयारण्य क्षेत्रात असलेल्या सर्वे डोंगराचा ढस ढासळून वेळप्रसंगी रस्त्यावर माती–दगड येऊन वाहतूक ठप्प होण्याची शक्यता लक्षात घेऊन फणसाड अभयारण्य विभागाने उपाययोजना करण्याची मागणी जोर धरीत आहे.

मागील काही वर्षापूर्वी सर्वे डोंगराचा ढस ढासळून माती व मोठे दगड रस्त्यावर आल्यामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.



फणसाड वन्यजीव अभयारण्य व सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सर्वे डोगराचा काही भाग उतरवून उपाययोजना करण्यात आल्या होत्या. तीन जुलै २०२० रोजी झालेले निसर्ग चक्रीवादळ तसेच मागील ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जोरदार वादळी पावसानंतर पुन्हा सर्वे डोगराचा ढस ढासळून माती दगड खाली आले होते. चारपाच दिवस जोरदार पडलेल्या पावसामुळे साळाव–मुरुड रस्त्याची पुन्हा जैसे थे अवस्था असून कोर्लई,बोर्ली, मांडला परीसरात रस्त्यावर काही ठिकाणी पाणी आल्याने खड्डे पडले आहेत. वेळ प्रसंगी काही दिवस पावसाचा जोर राहिल्यास, मोठ्या प्रमाणावर पाऊस आल्यास या डोंगराचा ढस ढासळून माती व दगड रस्त्यावर येण्याची व वाहतुकीवर परिणाम होण्याची तसेच वेळप्रसंगी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन जिवित व वित्त हानी टाळण्यासाठी यात लोकप्रतिनिधींनी लक्ष घालून व फणसाड अभयारण्यच्या संबंधित अधिका–यांनी पाहाणी करून उपाययोजना करण्याची मागणी जोर धरीत आहे.